## *राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक*

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्र. रामाआ-नाशिक/द्वितीय अपील क्रमांक :- १४५८/२०१८/अहमदनगर**

१ श्री. गुलाबराव भादु पवार, : अपिलार्थी
रा. एकनाथनगर, केडगांव,
ता. जि. अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सरकारी कामगार अधिकारी,
सहायक कामगार आयुक्त यांचे कार्यालय,
सथ्था कॉलनी, आशिष बिल्डिंग, स्टेशन रोड, अहमदनगर,
ता. जि. अहमदनगर.

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
सहायक कामगार आयुक्त,
सहायक कामगार आयुक्त यांचे कार्यालय,
सथ्था कॉलनी, आशिष बिल्डिंग, स्टेशन रोड, अहमदनगर,
ता. जि. अहमदनगर.

**ऑनलाईन सुनावणी दिनांक ०६/०६/२०२२**

अपिलार्थी यांनी दिनांक ०३/०८/२०१८ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. त्यामध्ये दिनांक ०६/०६/२०२२ रोजी meet.google.com/xra-mmqo-dhe या गुगल मिट कोडद्वारे आयोजित ऑनलाईन सुनावणीदरम्यान अपिलार्थी उपस्थित होते. तत्कालीन (सेवानिवृत्त) व विद्यमान जन माहिती अधिकारी उपस्थित होते. तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित होते.

सुनावणीदरम्यान तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी हे कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्वपरवानगी न घेता संयुक्तिक कारणाशिवाय अनुपस्थित आहेत. वास्तविक सामान्य प्रशासन विभागाने

शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दिनांक ०१/१२/२०१५ नुसार खालीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत:-

"माहिती उपलब्ध करुन देण्यानुषंगाने संबंधित जन माहिती अधिकाऱ्याने तसेच प्रथम अपिलीय अधिकाऱ्याने माहिती उपलब्ध करुन देण्यात हेतुपुरस्सरपणे टाळाटाळ केल्याचे निदर्शनास आल्यास त्याची गंभीर दखल घेतली जाईल. द्वितीय अपील सुनावणीत तत्कालीन जन माहिती अधिकारी, आयोगाने आदेशित केले असल्यास प्रथम अपिलीय अधिकारी तसेच इतर संबंधित अधिकारी आयोगाच्या पूर्वपरवानगीशिवाय किंवा कोणतीही लेखी सूचना न देता द्वितीय अपिलाच्या सुनावणीस गैरहजर राहिल्यास आवश्यकतेनुसार त्यांच्यावर नियमानुसार कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल".

शासनाच्या अशा स्पष्ट सूचना असतानादेखील संबंधित तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित असल्याने त्यांच्याविरुध्द कारवाई करणे आवश्यक आहे.

अपिलार्थी यांनी द्वितीय अपील अर्जात नमूद केले आहे की, त्यांच्या दिनांक १७/१०/२०१७ रोजीच्या माहिती अर्जास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी दिशाभुल करणारी माहिती पुरविली. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी देखील दिशाभुल करणारा आदेश पारित केला. त्यामुळे प्रस्तुत द्वितीय अपील दाखल केले आहे.

सुनावणीदरम्यान तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपिलार्थी यांनी दिनांक १७/१०/२०१७ रोजीच्या माहिती अर्जान्वये दिनांक २०/११/२०१६ ते दिनांक २१/११/२०१६ पावेतो कायनेटीक इंजि लि., कंपनीतील कामगारांचे दिनांक २०/११/२०१६ रोजी सुरु होणारी प्रथम शिप्ट, दुसरी शिप्ट व दिनांक २१/११/२०१६ रोजी संपणारी तिसरी शिप्ट मधील कामगारांचे हजेरी पत्रक/(रजि) हजेरी रजिस्टरची प्रमाणित प्रत कोर्ट कामासाठी असिस्टन जनरल मॅनेजर, पर्सनल डिपार्टमेंट श्री. गुळवे यांना दिनांक ०९/०९/२०१६ रोजी माहिती अधिकार अधिनियम, २००५ अन्वये त्यांना अर्ज रजिस्टर पोस्टाने पाठविलेला असुन या संदर्भीय ३० दिवस झालेले असुन रजिस्टर पाकिट ताब्यात दिलेले आहे याबाबत माहिती मागितली होती. त्यास अनुसरुन अपिलार्थीस दिनांक १६/११/२०१७ रोजीच्या पत्रान्वये कार्यालयात कंपनीमधील कामगारांचे हजेरी पत्रक ठेवले जात नाही, माहिती निरंक समजण्यात यावी, असे कळविले आहे. तद्नंतर अपिलार्थी यांनी दिनांक १८/१२/२०१७ अन्वये प्रथम अपील दाखल केले.

सुनावणीदरम्यान विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सांगितले की, अपिलार्थी यांनी दिनांक १८/१२/२०१७ अन्वये दाखल केलेल्या प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०६/०२/२०१८ रोजी निर्णय पारित करुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध नाही, असे पत्रान्वये कळविले आहे, अपिलार्थी यांनी कार्यालयास सादर केलेला माहिती अधिकार अर्ज व्यवस्थापक, कायनेटीक इंजिनिअरींग कं. प्रा.लि. अहमदनगर यांचेकडे वर्ग करावा, असे निर्देश जन माहिती अधिकारी यांना देऊन प्रथम अपील निकाली काढले.

सुनावणीदरम्यानचा युक्तिवाद व आयोगास सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता असे दिसून आले की, अपिलार्थी यांच्या दिनांक १७/१०/२०१७ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस विहित मुदतीत कार्यालयात कंपनीमधील कामगारांचे हजेरी पत्रक ठेवले जात नाही, माहिती निरंक समजण्यात यावी, असे कळविले असल्याचे स्पष्ट होते. तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान आयोगास ते शासकीय सेवेतुन सेवानिवृत्त झाले असल्याचे सुचित केले. वास्तविक व्यवस्थापक, कायनेटीक इंजिनिअरींग कं. प्रा.लि. अहमदनगर ही खाजगी संस्था असतानाही तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक १८/१२/२०१७ अन्वये दाखल केलेल्या प्रथम अपिलाची सुनावणी घेऊन निर्णय पारित करताना नैसर्गिक न्यायतत्वाच्या आधारे गुणवत्तेवर आधारीत "समन्यायिक" व वस्तुनिष्ठ स्वरुपाचा आदेश पारित न करता अपिलार्थी यांचा माहिती अधिकार अर्ज व्यवस्थापक, कायनेटीक इंजिनिअरींग कं. प्रा.लि. अहमदनगर यांचेकडे वर्ग करावा, असे नमुद करुन प्रथम अपील निकाली काढण्यात येत आहे, असा नियमबाहय अयोग्य निर्णय पारित केला, ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(६) मधील नमुद तरतुदींचा भंग करणारी आहे. म्हणून प्रथम अपिलीय अधिकारी यांचेविरुध्द सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र. केंमाअ-२००७/११८२/प्र.क्र.१६५/०७/०६, दिनांक १२/१२/२००७ च्या शासन परिपत्रकाचे अनुपालन केले नसल्याने त्यांचेविरुध्द सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन परिपत्रक केंमाआ-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दिनांक ३१/३/२००८ नुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये, याबाबत लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे. तरी आता विद्यमान जन माहिती

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागितलेली माहिती व्यवस्थापक, कायनेटीक इंजिनिअरींग कं. प्रा.लि. अहमदनगर यांचेकडुन प्राप्त करुन घेउुन पुरविणे योग्य होईल.

सबब, या प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१) विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सरकारी कामगार अधिकारी, सहायक कामगार आयुक्त यांचे कार्यालय, सथ्था कॉलनी, आशिष बिल्डिंग, स्टेशन रोड, अहमदनगर यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १७/१०/२०१७ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात व्यवस्थापक, कायनेटीक इंजिनिअरींग कं. प्रा.लि. अहमदनगर या संस्थेकडुन माहिती प्राप्त करुन घेऊन उपलब्ध माहिती समक्ष विनामूल्य पुरवावी.

२) तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक कामगार आयुक्त, सहायक कामगार आयुक्त यांचे कार्यालय, सथ्था कॉलनी, आशिष बिल्डिंग, स्टेशन रोड, अहमदनगर, श्री. नितीन पाटणकर यांनी अपिलार्थी यांनी दिनांक १८/१२/२०१७ अन्वये दाखल केलेल्या प्रथम अपिलाची सुनावणी घेऊन अपिलार्थी यांचा माहिती अर्ज व्यवस्थापक, कायनेटीक इंजिनिअरींग कं. प्रा.लि. अहमदनगर या खाजगी संस्थेकडे वर्ग करावा, असा अयोग्य निर्णय पारित केला. त्यामुळे त्यांचेविरुध्द सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र.केंमाअ-२००७/११८२/प्र.क्र.१६५/०७/०६, दिनांक १२/१२/२००७ च्या शासन परिपत्रकाचे अनुपालन केले नसल्याने त्यांचेविरुध्द सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन परिपत्रक केंमाआ-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दिनांक ३१/३/२००८ नुसार कार्यवाही प्रस्तावित का करण्यात येऊ नये, याबाबतचा याचा लेखी खुलासा आदेश प्राप्तीच्या ७ दिवसांचे आत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही, असे गृहित धरुन शासन परिपत्रक दि.३१/०३/२००८ नुसार कार्यवाही प्रस्तावित करण्याबाबतचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३) कामगार आयुक्त, कामगार आयुक्त कार्यालय, अहमदनगर यांना सामान्य प्रशासन विभागाने शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दिनांक ०१/१२/२०१५ नुसार असे आदेश देण्यात येत आहेत की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित राहिले असल्याने त्यांच्याविरुध्द वरील परिपत्रकास अनुसरुन नियमानुसार कार्यवाही करण्यात यावी.

४) वरील निर्देशांसह प्रस्तुत द्वितीय अपील क्रमांक १४५८/२०१८/अहमदनगर निकाली काढण्यात येत आहे.

**(समीर सहाय)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ नाशिक**

**प्रति,**

१. कामगार आयुक्त, कामगार आयुक्त कार्यालय, अहमदनगर,ता. जि. अहमदनगर.
यांनी आयोगाच्या आदेशाची प्रत संबंधित अधिकारी यांना हस्तांतरीत करुन पोच उलट टपाली आयोगाला सादर करावी, तसेच आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी सुनिश्चित करुन अहवाल ३० दिवसांचे आत सादर करावा.

२. श्री. नितीन पाटणकर, (तत्कालीन जन माहिती अधिकारी), सहायक कामगार आयुक्त, सहायक कामगार आयुक्त यांचे कार्यालय, सथ्था कॉलनी, आशिष बिल्डिंग, स्टेशन रोड, अहमदनगर, ता. जि. अहमदनगर.

---

क्रमांक : रामाआ-नाशिक/द्वि.अ.क्र./१४५८/२०१८/अहमदनगर ओ- १६७८ दिनांक 10/08/2022

---